
# नवाकाळ शब्दकोडे-१०४



**आडवे शब्द –**

१. सर्वात धाकटे अपत्य ३. होऊन गेलेला काळ ५. दमदाटी करणे ९. बदनामी, नालस्ती १०. व्यवस्थित ११. लोकात न मिसळणारा, एकलकोंडा १२. पातळ चवदार भाजी १३. पाणी व चिखल साठलेला खळगा १५. पूर्वीच्या काळी बोलवा असलेली चेटकीण १७. हुशार १९. वट, लग्गा २०. शांतता २२. खस २३. शैली, धाटणी २५. स्वयपाकाची कला २७. सारवासारवी २९. वायस, कावळा ३०. कापूस ३१. नमुना, गणित ३३. पाचवा सूर, आर. डी. बर्मनचे टोपणनाव ३५. खग, पक्षी ३७. आरामदायक आसन, क्रीडाप्रशिक्षक ३८. निरुपाय ४१. वक्र ४३. घाव, आघात ४५. विपर्यास, गैर अर्थ ४८. मूर्तीभोवतीची आरास, महिरप ४९. शरीर, देह ५०. चारी बाजू समान व चारी कोन काटकोन असलेली आकृती ५१. कुशल, कसबी ५२. ज्वारीच्या पिकातील तण ५४. गाडीचा कंडक्टर, विज्ञानात वीज वाहून नेणारी तार ५५. विजया दशमी ५७. उपवासाचा गोडसर कंद ५९. पोपटाचे आवडते फळ ६०. बांबू, कीचक ६१. सांप्रत, विद्यमान काळ ६५. गद्दारी ६७. स्वाक्षरी ६९. सनसनाटी, खळबळ माजवणारे ७२. भस्म ७४. मिसळलेला, एकजीव, तद्रूप ७५. अचंबा, आश्चर्य ७७. नाम, होडी, नौका ७८. दुर्दशा ८१. शिष्ट, भाव खाणारा ८४. दोलायमानता ८७. क्रीडापटू ८८. हरीण, एक नक्षत्र ८९. बारा वर्षे ९१. कासव, कच्छप ९२. मेंढीचे पिल्लू, कोकरू ९३. काळजीत पडलेला ९६. शत्रू, वैरी ९७. टंचाई, कमतरता ९९. काया, देह १०१. ज्या महिन्यात सूर्याची दोन संक्रमणे होतात १०३. पुरुषांचे एक शिरोभूषण १०५. शेपूट १०६. शास्त्रशुद्ध पद्धत, टेक्निक १०७. हत्तीचे पिल्लू १०९. अधोगत, पतित ११०. शासन १११. कुस्तीतला एक डाव

**उभे शब्द –**

१. वाचीवीर, आयत्या वेळी पळ काढणारा शिपाई २. कापडाचा तुकडा ३. प्रतिबंध ४. अंधाराचा शत्रू, सूर्य ५. भीती, धास्ती ६. दहावे नक्षत्र ७. दुर्लक्ष करणे ८. क्रोध, संताप, चीड १०. धुके १२. धोबी, परीट १४. बकपक्षी १६. आईचे वडील १८. लहान मूल २०. अशुद्ध रक्त वाहून नेणारी शीर, मुलींचे एक नाव २१. जिन, खोगीर २४. डाग, कलंक २६. भांडण, संघर्ष २८. कठोर शब्दात कानउघाडणी २९. मनीषा, आस, इच्छा ३०. पडताळणी ३२. मदिरा ३३. सांघिक खेळात निर्णय देणारा, अंपायर ३४. हुशार ३५. तांबूल ३६. एक शेंगभाजी ३७. अवकृपा, नाराजी ३९. इमारत, बंगला ४०. अशक्त व लुकडा ४२. दयावान ४४. कुमक, सहाय्य ४५. थिटा, नकटा ४६. मिंधा ४७. भेग, फट ५०. जिज्ञासू ५२. कुलूप ५३. वाया, व्यर्थ ५६. पडसे ५८. द्रमुक पक्षाची चलती असलेले भारताच्या सागरकिनाऱ्यावर असलेले मोठे राज्य ५९. पोषाख ६०. खुळचट ६२. एकाच गोष्टीचे निरंतर चिंतन ६३. साखरेला पर्याय ६४. इंग्रजी सहावा महिना ६६. बेरकी ६८. तुच्छ ६९. दुष्ट माणूस, काथ्याकूट ७०. सातू ७१. चषक ७३. दगड ७६. कृष्ण पक्ष ७९. चांदी ८०. उष्णता, झळ ८१. विरोध, प्रतिबंध ८२. खत्रूड, तिरसट ८३. भुंगा ८४. चामडे ८५. कठीण, अवघड ८६. टुमणे, धोशा ८७. ग्रामीण भागातील रहिवासी ८८. दिवंगत, मेलेला ९०. प्रदेश, टापू ९१. वाटचाल ९४. कापडाचा तुकडा ९५. आवडती व्यक्ती ९७. वादळ ९८. चोपडी, नोटबुक १००. घुंगरू १०१. राज्याचा प्रमुख, राजा, राजाने नेमलेला मुख्य अधिकारी १०२. मर्कट १०३. प्रामाणिक व्यक्ती १०४. स्वच्छंद १०६. समज, ताकीद १०८. सभ्य, सज्जन •

**नवाकाळ कोडे क्रमांक १०३ चे उत्तर**

**आडवे शब्द** : २. कसब ४. अटकळ ६. मासा १०. कठीण ११. लक्तरे १३. पदरमोड १६. खडावा १७. रानटी १९. रंग २१. कठोर २३. नरवीर २५. नेभळट २६. पाटव २९. मालक ३१. चल ३२. उतारवय ३३. पाईक ३४. बोरीक पावडर ३७. गळा ३८. भाऊ ३९. बखळ ४१. माती ४२. जवान ४३. सय ४५. साल ४६. समता ४८. तीज ५१. दार ५३. मेथी ५४. जवळीक ५५. रमतगमत ५९. सवत ६२. लत ६३. बेताल ६४. लगबग ६५. चाकू ६६. परत ६९. रीम ७१. टवटवी ७३. काव ७५. लहानसा ७८. अंतिम ७९. अवनी ८०. वन्ही ८१. नव ८३. वेधशाळा ८५. रात ८६. बटीक ८८. धबधबा ९१. रास ९२. खुबा ९३. रगड ९५. डाव ९७. राडा ९९. कढी १०१. वर्ज्य १०२. रबडी १०३. चक्रपाणि १०४. सदा १०६. गजरा १०८. बोजड १०९. धन १११. दास ११४. अक्का ११५. विनासायास ११६. हवालदिल

**उभे शब्द** : १. झाकपाक २. कणखर ३. बलवान ४. अरेरावी ५. कपटी ७. साप ८. वैर ९. खोड १२. आरंभ १४. दर्या १५. मोकाट १८. नरमाई २०. गळसरी २२. ठोकताळा २४. रमी २५. नेक २६. पालव २७. वखर २८. नवविवाहित ३०. लकब ३१. चपाती ३२. उगवती ३३. पाऊस ३४. बोळ ३५. कमाल ३६. डळमळीत ४०. खच ४४. यदा ४५. साथी ४६. सवलत ४७. ताक ४९. जरतारी ५०. उमग ५२. रस ५३. मेतकूट ५६. मलमल ५७. गलथान ५८. तबला ६०. वचा ६१. खोपट ६७. रवी ६८. नवनीत ७०. प्रतिशोध ७२. वसुंधरा ७३. कावराबावरा ७४. अवसर ७६. हाकाटी ७७. सान ८२. वध ८४. शासक ८६. बडबड ८७. कडा ८९. बलोपासना ९०. बारा ९४. गरज ९६. वचन ९८. डास १००. ढीग १०५. दादा १०७. जटिल १०८. बोट १०९. धक्का ११०. प्रिया ११२. सह ११३. शैल

# सीएसएमटीत मॅजिक मिरर बसवणार लोकांना आभासी जग अनुभवता येणार

■ मुंबई

**छत्रपती** शिवाजी महाराज टर्मिनसच्या फलाट क्रमांक ११ आणि १२ वर ऑगमेंटेड रियालिटी (एआर) मॅजिक मिरर बसवण्यात येणार आहे. त्यामुळे प्रवासी आणि पर्यटकांना मोठ्या स्क्रीनवर आभासी जगाचा अनुभव घेता येणार आहे. यात डिजिटल रेल्वे गाड्यांचे वेळापत्रक दाखवण्यात येणार आहे. ही सेवा २ महिन्यांत सुरू करण्यात येणार आहे, अशी माहिती मध्य रेल्वेच्या अधिकाऱ्यांनी दिली.

छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस हे मध्य रेल्वेचे प्रमुख रेल्वे स्थानक आहे. येथून लोकल आणि लांब पल्ल्याच्या प्रवाशांची ये-जा सुरू असते. त्यांना या सेवेमुळे आभासी जगाचा अनुभव घेता येणार आहे. यातील करमणुकीत दर महिन्याला बदल केला जाणार आहे. जंगल सफारी, बर्फाळ प्रदेश आणि अन्य आभासी अनुभवाचा यात आनंद घेता येणार आहे. छत्रपती शिवाजी टर्मिनसच्या फलाट क्रमांक ११ आणि १२ वर ही सेवा उपलब्ध केली जाणार आहे. त्यासाठी मोठा एलईडी स्क्रीन बसवण्यात येणार आहे. या योजनेच्या आराखड्याला मंजुरी मिळाली आहे. त्यामुळे हा मॅजिक मिरर दोन महिन्यांत प्रवासी आणि पर्यटकांच्या सेवेत येईल, असे त्यांनी सांगितले.

# एसटी महामंडळाचे विलिनीकरण शक्य नाही

» पान १ वरून

कर्मचाऱ्यांनी पुकारलेला हा संप बेकायदेशीर असल्याचे औद्योगिक न्यायालयाने म्हटले होते. मात्र तरीही कर्मचारी आपापल्या मागणीवर ठाम राहिले आणि संप सुरूच ठेवला. त्यानंतर हायकोर्टाने कर्मचाऱ्यांच्या मागण्यांवर एक त्रिसदस्य समिती गठीत केली होती. या समितीने १२ आठवड्यांत आपला अहवाल सादर करावा असे हायकोर्टाने आपल्या निर्देशात म्हटले होते. त्यानुसार त्रिसदस्यीय समितीने काही शिफारशी सूचवत अहवाल हायकोर्टात सादर केला होता. मात्र हा अहवाल राज्य मंत्रिमंडळात सादर करावा व त्यावर मंत्रिमंडळाकडून जो काही निर्णय घेण्यात येईल तो निर्णय आम्हाला दोन आठवड्यांत कळवावा, असे आदेश हायकोर्टाने राज्य सरकारला दिले होते. त्यानुसार आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत समितीने राज्य सरकारला अहवाल सादर केला. समितीने मांडलेल्या अहवालात एसटी कर्मचाऱ्यांना राज्य सरकारच्या सेवेत विलिनीकरण करण्यात येऊ नये. विलिनीकरणाचा भार राज्य सरकार सोसू शकत नाही. त्यामुळे विलिनीकरण करणे शक्य नाही, असे म्हटले आहे. समितीचा हा अहवाल मुख्यमंत्री उध्दव ठाकरे यांच्याकडेही सोपवण्यात आला आहे. उद्या राज्याचे परिवहन मंत्री अनिल परब अधिवेशनात हा अहवाल पटलावर ठेवणार आहेत. त्रिसदस्यीय समितीच्या या अहवालामुळे आता एसटी कर्मचाऱ्यांचा विलिनीकरणाचा कायदेशीर मार्ग बंद झाला आहे.

# इचलकरंजीला पाणी देणार नाही दूधगंगा नदीकाठच्या शेतकऱ्यांचे आंदोलन

■ कसबा सांगाव

**इचलकरंजीला** देण्यात येणाऱ्या पाणी योजनेला दूधगंगा बचाव कृती समितीने काल कागल तालुक्यात सुळकुड येथे आंदोलन करून कडाडून विरोध केला. ही योजना शासनाने ताबडतोब रद्द करावी किंवा दूधगंगा कृष्णा नदी संगमावरील दानवाड येथून पाणी द्यावे किंवा सध्या सुरू असलेल्या बस्तवाड येथील कृष्णा नदीच्या योजनेतूनच वाढीव पाणीपुरवठा करावा. मात्र दूधगंगेचे पाणी कदापि दिले जाणार नाही, असे दूधगंगा बचाव समितीमार्फत प्रशासनाला ठणकावून सांगण्यात आले. यावेळी दूधगंगा बचाव कृती समिती दत्तवाडचे उपाध्यक्ष आण्णासो सिदनाळे, काले पंचायत समिती सदस्या मिनाज जमादार, गुरुदत्तचे संचालक, बबनराव चौगुले, सुळकुड सरपंच सुप्रिया भोसले यांच्यासह विविध गावांतील सेवा संस्था, पाणीपुरवठा, दूध संस्थांचे पदाधिकारी उपस्थित होते. कसबा सांगावचे पदाधिकारी व शेतकरी उपस्थित होते. याठिकाणी शेतकऱ्यांनी आंदोलन करून 'देणार नाही, देणार नाही इचलकरंजीला एक थेंबही पाणी देणार नाही, पाणी आमच्या हक्काचं नाही कुणाच्या बापाचं' या घोषणेने दूधगंगा नदीवरील पूल दणाणून सोडला. दत्तवाड घोसरवाड सुळकुड, कसबा सांगाव, मौजेसांगाव टाकळीवाडी दानवाडसह दूधगंगा काठावरील शेतकऱ्यांनी आंदोलन केले.

# पालिकेतील ४७ सुरक्षा रक्षकांना ६ महिन्यांची मुदतवाढ मिळाली

**उल्हासनगर, प्रतिनिधी** - उल्हासनगर मनपाच्या ४७ कंत्राटी सुरक्षा रक्षकांना कामावरून काढून टाकण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला होता. मात्र ऐन कोरोनाच्या काळात या सुरक्षा रक्षकांना काढून टाकल्यास त्यांच्यावर उपासमारीची वेळ येईल हे लक्षात घेऊन काँग्रेस शहर जिल्हा अध्यक्ष रोहित साळवे यांनी सुरक्षा रक्षकांना मुदतवाढ द्यावी अशी मागणी केली होती. प्रशासनाने ही मागणी मान्य करून सुरक्षा रक्षकांना मुदतवाढ दिली आहे. ३१ जानेवारी २०२२ रोजी उल्हासनगर महापालिकेच्या स्थायी समितीच्या सभेत कोरोना काळात नियुक्त केल्या गेलेल्या ४७ सुरक्षा रक्षकांना कामावरून काढण्याचा ठराव संमत करण्यात आला होता. या निर्णयामुळे ४७ कुटुंब आर्थिक संकटात सापडली होती. तसेच त्यांच्या उपजीविकेचा प्रश्न निर्माण झाला होता.

**जाहीर सुचना**

तमाम जनतेला याद्वारे सुचित करण्यात येते की, सदनिका क्र. १०४, पहिला मजला, बिल्डींग नं. ई/२४, दिवाण अँन्ड शाह एन्चलेव्ह, सांजवात को.ऑप.हौ.सो.लि., किश्ना टाउनशिप, अंबाडी रोड, वसई रोड पश्चिम, ता. वसई, जि. पालघर, या मिळकतीच्या सह-मालक श्रीमती कमला लक्ष्मण या होत्या व त्यांचे दिनांक ३०/१०/२००८ रोजी निधन झाले असून त्यांच्या मृत्यूपश्चात सदर मिळकत त्या सदनिकेच्या सहमालक टी. एल. रुग्मीणी यांच्या नावे सदर सोसायटीने हस्तांतरीत केली आहे. म्हणून सदर सदनिकेचे मालकी हक्क निर्वीवाद करण्याकामी हरकती मागवित आहोत. जर इतर कोणत्याही व्यक्तिला वा संस्थेला वर उल्लेखिलेल्या मालमत्तेच्या हस्तांतरणाबाबत कोणताही हक्क, दावा आणि हितसंबंध असल्यास ते सुचना प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांत पुष्टयर्थ कागदपत्रांसोबत आमच्या खाली उल्लेखिलेल्या पत्त्यावर लेखी स्वरुपात पाठवावे अन्यथा असे दावे त्यागित, अधित्यागित समजण्यात येतील व सदर मिळकतीचे शेअर्स व त्याचे निर्वीवाद मालक टी. एल. रुग्मीणी या समजणेत येतील याची नोंद घ्यावी

**पत्ता – ॲड. श्री. पराग ज. पिंपळे, वकील, मुंबई उच्च न्यायालय,**

एस/४, प्रविण पॅलेस, पंडित दिनदयाळ नगर, वसई रोड पश्चिम, ता. वसई, जि. पालघर

मो. ९८९००७९३५२ दिनांक:०३.०३.२०२२

# राज्यातील १४ जिल्ह्यांमध्ये कोरोना निर्बंध शिथिल

» पान १ वरून

नागरिकांचे प्रमाण ९० टक्क्यांपेक्षा जास्त, दुसरा डोस घेतलेल्या नागरिकांचे प्रमाण ७० टक्क्यांपेक्षा जास्त, तसेच पॉझिटिव्हिटी रेट १० टक्क्यांपेक्षा कमी आणि आयसीयूमधील ऑक्सिजन बेड ४० टक्क्यांहून कमी प्रमाणात भरलेले असतील अशा जिल्ह्यांचा समावेश 'अ' श्रेणीत करून त्या ठिकाणचे निर्बंध शिथिल करण्यात आले आहे. 'अ' श्रेणीतील जिल्ह्यांमध्ये सामाजिक, क्रीडा, मनोरंजन, शैक्षणिक, सांस्कृतिक, राजकीय किंवा उत्सवाशी संबंधित कार्यक्रम हॉल किंवा मैदानाच्या ५० टक्के क्षमतेने घेण्यास परवानगी देण्यात आली आहे. यामध्ये लग्न आणि अंत्यसंस्काराच्या विधीचा देखील समावेश करण्यात आलेला आहे. या जिल्ह्यांमधील सर्व शाळा, महाविद्यालयांमध्ये ऑफलाईन वर्ग सुरू करण्यास परवानगी देण्यात आली आहे. यासंदर्भात संबंधित सरकारी विभाग वा स्थानिक प्रशासनाने दिलेल्या निर्देशांनुसार हे वर्ग सुरू करता येतील. अंगणवाडी आणि शिशुगटांचे वर्ग देखील सुरू करण्यास परवानगी देण्यात आली आहे. या जिल्ह्यांमध्ये होम डिलिव्हरी सेवा सुरू करण्यात आलेल्या आहेत. मात्र सेवा पुरविणाऱ्या कर्मचाऱ्यांनी कोरोना लसीचे दोन्ही डोस घेणे बंधनकारक असणार आहे. 'अ' गटातील जिल्ह्यांमध्ये शॉपिंग कॉम्प्लेक्स, सिनेमागृह, रेस्टॉरंट, बार, क्रीडांगण, जिम, स्पा, स्विमिंग पूल, धार्मिक स्थळे, नाट्यगृह, पर्यटनाची ठिकाणे, मनोरंजन पार्क आदी ठिकाणे देखील १०० टक्के क्षमतेने सुरू करण्यास परवानगी देण्यात आली आहे. मात्र चित्रपटगृहे , मॉल्स आणि इतर ठिकाणी प्रवेश देताना लसीचे दोन डोस बंधनकारक असणे आवश्यक राहणार आहे.जिल्ह्यांतर्गत आणि राज्यांतर्गत प्रवासासाठी पूर्ण लसीकृत झालेल्या व्यक्तीला परवानगी असेल. पूर्ण लसीकरण नसलेल्या व्यक्तीला ७२ तासांपूर्वीचा निगेटिव्ह आरटीपीसीआर अहवाल प्रवासासाठी बंधनकारक असेल. खासगी आणि सरकारी अशा दोन्ही प्रकारच्या कार्यालयांना देखील पूर्ण क्षमतेने काम करण्याची परवानगी देण्यात आली आहे. याशिवाय, अ श्रेणीमध्ये येणाऱ्या सर्व जिल्ह्यांमध्ये सर्व प्रकारच्या सार्वजनिक ठिकाणी शंभर टक्के क्षमतेने कामकाजाची मुभा देण्यात आली आहे. इतर जिल्ह्यांमध्ये हे प्रमाण ५० टक्क्यांपर्यंत असेल.

**PUBLIC NOTICE**

Notice is hereby given that the following Share Certificates for 19 Equity shares of FV Rs. 10/- (Rupees Ten only) each with Folio No.021523194 of Reliance Industries Limited, having its registered office at Maker Chambers IV, 3rd Floor, 222 Nariman Point, Mumbai, Maharashtra - 400021 registered in the name of **JEDHE SHYAMRAO BABURAO** have been lost. **Shyamrao Baburao Jedhe** have applied to the company for issue duplicate certificate. Any person who has any claim in respect of the said shares certificate should lodge such claim with the company within in 15 days of the publication of this notice.

| Folio No. | No. of Shares | Certificate no. | Distinctive Nos From - To |
|---|---|---|---|
| 021523194 | 19 | 13194710 | 289804876 - 289804894 |

Place : Mumbai
Date : 3/3/2022

Sd/-
**Shyamrao Baburao Jedhe**

# अजित पवारांच्या शब्दाला किंमत नाही! फडणवीसांची टीका

» पान १ वरून

इब्राहिमला सहकार्य केले, मुंबईच्या खुन्यांशी ज्यांनी व्यवहार केला, त्यांना वाचवायला अख्खं सरकार उभं राहिले आहे. पोलीस कोठडीत गेल्यानंतर देखील मंत्रिपदावर ती व्यक्ती कायम आहे. एकप्रकारे हा राज्यघटनेचा अवमान सरकार करत आहे. मला आश्चर्य वाटते, ज्या सरकारचे प्रमुख शिवसेनेचे नेते आहेत, ते सरकार मुंबईच्या खुन्यांसोबत व्यवहार करणाऱ्यांच्या पाठिशी उभे आहे ही अतिशय दुर्दैवी बाब आहे. नवाब मलिक यांचा राजीनामा घेतला गेला पाहिजे. यासाठी भाजपा सभागृहात संघर्ष करेल, असेही फडणवीस म्हणाले.

ते पुढे म्हणाले की, शेतकऱ्यांप्रती सरकारची भूमिका ही अहंकाराची आहे. ज्या बळीराजामुळे आज आपण प्रतिनिधीत्व करीत आहोत याची जाणीव तरी सरकारने ठेवायला पाहिजे. गेल्या दोन वर्षापासून शेतकरी हा अस्मानी संकटाशी दोन हात करीत आहे. अशा प्रतिकूल परस्थितीमध्ये शेतकऱ्यांना मदतीचा हात देण्याचे सोडून वीज पुरवठा खंडीत केला जात आहे. शिवाय कालावधी संपूनही ऊस अजून फडातच आहे. ऊस गाळप हंगाम आता अंतिम टप्प्यात आला आहे. असे असताना पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भातील अतिरिक्त ऊसाचा प्रश्न हा कायम आहे. राज्य सरकारचे योग्य नियोजन नसल्यामुळेच शेतकऱ्यांवर ही वेळ आली आहे. वर्षाचा कालावधी पूर्ण होऊन देखील ऊसाचे गाळप झालेले नाही. त्यामुळे उत्पादनावर त्याचा परिणाम होणार आहे. ऊसाचे वजन घटणार असून याला जबाबदार हे सरकारच असल्याचा घणाघातही फडणवीस यांनी केला. तसेच सत्ता स्थापन होताच महात्मा फुले कर्जमाफी योजनेची घोषणा करण्यात आली होती. दोन वर्षानंतरही अनेकांना या योजनेचा लाभ झालेला नाही.

एवढेच नाही तर जे शेतकरी नियमित कर्ज अदा करीत होते त्यांना प्रोत्साहनपर ५० हजार रुपये देण्याचे राज्य सरकारने कबूल केले होते. पण याचा विसर पडला असून या सरकारवरील शेतकऱ्यांचा विश्वास उडाला आहे. तर दुसरीकडे वीज पुरवठा खंडीत केला जाणार नसल्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी ठणकावून सांगितले होते. पण त्यांच्या म्हणण्याला आता अधिकचे महत्व राहिलेले नाहीत. त्यामुळेच उर्जा मंत्री हे विद्युत पुरवठा खंडीत होणारच असल्याचे सांगत आहेत. निर्णयामध्ये एक वाक्यता नसल्यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान होत आहे. मराठा आरक्षण, ओबीसी आरक्षण हे दोन महत्वाचे विषय आहेत. मराठा समाजाच्या योजना बंद करण्याचे काम या सरकारने केले आहे. हे सरकार पुर्णपणे फेल गेले आहे. या सरकारला एकच घटक महत्वाचा वाटतो तो म्हणजे दारु उत्पादन करणारा. त्यामुळे सरकारच्या चहापानाला आम्ही जाणार नाही, असेही फडणवीस म्हणाले. यावेळी फडणवीसांनी एसटी आंदोलनावरून देखील राज्य सरकारवर निशाणा साधला. अहंकार जेव्हा डोक्यात जातो आणि आम्ही म्हणजे सत्ता आहे असे राज्यकर्ते वागतात. असाच प्रकार एसटी आंदोलनाच्या संदर्भात दिसत आहे. सरकारने समितीचा अहवाल सार्वजनिक करायला पाहिजे.

# आर्यनकडे ड्रग नव्हते आणि तो कटातही नव्हता

» पान १ वरून

एनसीबीच्या मॅन्युअलमध्ये अनिवार्य असूनही छाप्याचा व्हिडिओ रेकॉर्ड करण्यात आला नव्हता. गुन्ह्यात अटक केलेल्या अनेक आरोपींकडून जप्त केलेले ड्रग्ज हे सिंगल रिकव्हरी म्हणून दाखवले आहेत, असेही एसआयटीने अहवालात म्हटले आहे.

**एनसीबीची खंडणीखोरी उघड**
**भाजपाने माफी मागावी-सचिन सावंत**

काँग्रेस नेते सचिन सावंत यांनी एनसीबी एसआयटीच्या आर्यन खान ड्रग्ज प्रकरणावरील अहवाल ट्विट करत भाजपवर निशाणा साधला आहे. एसआयटीने आर्यन खानकडे ड्रग्स नव्हते व समीर वानखेडे टीमने रेड टाकताना केलेल्या चुका प्रकाशात आणल्या आहेत. यातून अल्पसंख्यांक मंत्री नवाब मलिक यांचे आरोप योग्य होते आणि एनसीबीतर्फे खंडणीखोरी चालू होती हे स्पष्ट झाले आहे. एनसीबी नियमपुस्तिकेमधील नियमांचे उल्लंघन समोर दिसत असताना अधिकाऱ्यांवर कारवाई का झाली नाही? या रेडमध्ये भाजपाचा पदाधिकारी पंच म्हणून सामिल होता. महाराष्ट्रातील भाजपा नेते या अधिकाऱ्यांना पाठीशी घालत होते. भाजपाने जाहीर माफी मागावी. ज्या अधिकाऱ्यांनी पाठीशी घातले त्यांच्यासह वानखेडेच्या पूर्ण टीमवर कारवाई व्हावी. या अगोदर जेवढ्या तक्रारी झाल्या त्या सर्वांची चौकशी व्हावी अशी मागणी सचिन सावंत यांनी ट्विटरवरून केली आहे.

**FORM B**
**PUBLIC ANNOUNCEMENT**
(Regulation 12 of the Insolvency and Bankruptcy (Liquidation Process) Regulations, 2016)
**FOR THE ATTENTION OF THE STAKEHOLDERS OF GLOABTEL CONVERGENCE LIMITED**

| | | |
|---|---|---|
| 1. | Name of corporate debtor | GLOABTEL CONVERGENCE LIMITED |
| 2. | Date of incorporation of corporate debtor | 01/08/2000 |
| 3. | Authority under which corporate debtor is incorporated /registered | REGISTRAR OF COMPANIES, MUMBAI |
| 4. | Corporate Identity No. / Limited Liability Identification No. of corporate debtor | U72900MH2000PLC128007 |
| 5. | Address of the registered office and principal office (if any) of corporate debtor | Office No. 8, First Floor, Apollo House, Haji Kasam Building, 84, Mumbai Samachar Marg, Fort, Mumbai- 400001 |
| 6. | Date of closure of Insolvency Resolution Process | 03/08/2019 |
| 7. | Liquidation commencement date of corporate debtor | 21/02/2022 (RECEIVED ON 02/03/2022) |
| 8. | Name and registration number of the insolvency professional acting as liquidator | **Name:** Vijay Pitamber Lulla **Registration Number:** IBBI/IPA-001/IP-P00323/2017-18/10593 |
| 9. | Address and e-mail of the liquidator, as registered with the Board | **Registered Office:** 201, Satchitanand Bldg., 12th Road, Khar (W), Mumbai - 400 052 **E-Mail-** vijayplulla@rediffmail.com **Contact Number:** 9920279899 |
| 10. | Address and e-mail to be used for correspondence with the liquidator | **Corporate Office:** 203-B, Arcadia Bldg, 195, N.C.P.A. Marg, Nariman Point, Mumbai - 400021 **E-Mail-**vijayplulla@rediffmail.com **Contact Number:** 022-20821220 |
| 11. | Last date of submission of claim | 01/04/2022 |

Notice is hereby given that the Hon'ble National Company Law Tribunal, Mumbai, has ordered the commencement of Liquidation of the **Gloabtel Convergence Limited** on 21/02/2022. However, the said order was received by the Liquidator on 02/03/2022.
The stakeholders of Gloabtel Convergence Limited are hereby called upon to submit a proof of their claims, on or 01/04/2022 to the liquidator at the address mentioned against item 8.
The financial creditors shall submit their proof of claims by electronic means only. All other stakeholders may submit the proof of claims in person, by post or by electronic means.
Submission of false or misleading proofs of claim shall attract penalties.

**Vijay Pitamber Lulla** | Date: 03/03/2022 | Place: Mumbai